४०५४१

९६१

माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या
अंमल बजावणीबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2015 /प्र.क्र.( 247 /15) सहा.
मंत्रालय, मुंबई – 4000 32.
दिनांक- 29 .4.2015.

पहा- शासन पत्र क्र.संकिर्ण 2012/708/प्र.क्र353/सहा दि.22.8.2006.

परिपत्रक:-

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या अंमलबजावणी संदर्भाने आढावा घेतला असता सदर अधिनियमाच्या परिणामकारक व प्रभावी अंमलबजावणीचे काम न झाल्याचे नमूद करून राज्य शासन तसेच सार्वजनीक प्राधिकरण स्तरावर कामे प्रलंबित असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणी प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याची आवश्यकता मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी त्यांच्या दि.18.6.2012 च्या पत्रान्वये सूचित केली होती. त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे सदर पत्र संदर्भाधीन पत्रान्वये सर्व विभागांना पाठवून तदनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्याचे सूचीत करण्यात आले आहे. तथापि, तरीही सर्व विभागांच्या स्थानिक भाषेतील मार्गदर्शिका तयार करण्याची बाब आयोगाने आता प्रतीत केली आहे. तदनुसार माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या अंमलबजावणीसाठी सर्व विभागांच्या स्थानिक भाषेतील मार्गदर्शिका तयार करण्याबाबत सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

2. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या अंमलबजावणीसाठी सर्व विभागांच्या कामकाजासंबंधीच्या मार्गदर्शिका स्थानिक भाषेत तयार करून त्या जनमानसात त्यांच्या माहितीसाठी वितरित करण्यात याव्यात. तदनुसार, सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुख, त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख तसेच सार्वजनीक प्राधिकरणांनी आवश्यक कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य माहिती आयोगास थेट सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(र.व.गुरव)
शासनाचे उप सचिव.

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव,

५-५-१५

पुढील पृष्ठावर..........

Implemention of RTI- issues pending with Govt

मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.

सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.

सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.

*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (६०)

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई

सर्व मंत्रालयीन विभाग (प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह ) (३०)

सर्व विभागीय आयुक्त (६)

महासंचालक, यशदा, पुणे

सर्व जिल्हाधिकारी (३६)

निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

पत्राने पाठवायचे असल्यास पत्र जोडून पाकीटात घालून पाठवावे.